# ‘जीवनात अन्याय सहन करु नका’

कोल्हापूर ■
'जीवनात अन्याय सहन करु नका आणि संस्कृती सोडू नका' असे आवाहन प्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री अलका कुबल-आठल्ये यांनी केले.

ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते.

माझ्या करिअरमध्ये आईचे संस्कार मौल्यवान' ठरले आहेत असे सुरवातीलाच सांगून त्यांनी एकत्र कुटुंब पद्धतीची नितांत गरज असल्याचे सांगितले. प्रवासाची वाटचाल सांगताना त्या म्हणाल्या, पडद्यावर भूमिका साकारताना प्रेक्षकांना रडविण्यात माझा हातखंडा असला तरी वास्तव जीवनात मी सर्वांना आनंदाने हसवू शकते.

श्रीमती सुमती कुबल, प्रफुल्ल महाजन, 'सुवासिनीची सत्वपरीक्षा' चित्रपटाच्या निर्मात्या श्रीमती शिल्पा मसूरकर, उपप्राचार्य एस. एन. कोळेकर उपस्थित होते. प्रा. श्रीमती तेजस्विनी मुडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. श्रीमती भारती शेळके यांनी आभार मानले.



कमला कॉलेजमध्ये कार्यक्रमात बोलताना अलका आठल्ये.

---

सकाळ 8-10-04

# कमला महाविद्यालयाला अलका आठल्येंची भेट

कोल्हापूर, ता. १९ : येथील ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयाला अभिनेत्री अलका आठल्ये (कुबल) यांनी सदिच्छा भेट दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

या वेळी सौ. आठल्ये यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला. याप्रसंगी श्रीमती सुमती कुबल, प्रफुल्ल महाजन, श्रीमती शिल्पा मसूरकर, ज्युनिअर उपप्राचार्य एस. एन. कोळेकर, शिक्षक व विद्यार्थिनी उपस्थित होते.

प्रा. ए. एम. साळोखे यांनी संयोजन केले. प्रा. श्रीमती तेजस्विनी मुडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भारती शेळके यांनी आभार मानले.



कमला महाविद्यालयातील कार्यक्रमात बोलताना अभिनेत्री अलका आठल्ये.